# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

---

दि.२४/०८/२०२२

**<u>प्रेसनोट</u>**

### परदेशात कोविड लसीकरण झालेल्या व्यक्तींना दुसरा अथवा प्रिकॉशन डोस देणे बाबत

राष्ट्रीय कोविड १९ लसीकरण कार्यक्रमांतर्गत नॅशनल टेक्निकल अॅडव्हायझरी ग्रुप ऑन इम्युनायझेशन (NTAGI) यांनी केंद्र शासनास केलेल्या शिफारसीनुसार केंद्र शासनाने दि.२२ ऑगस्ट २०२२ पासून ज्या भारतीय किंवा परदेशी नागरिकांनी परदेशात कोविड लसीकरणाचा पहिला डोस घेतला आहे परंतु दुसरा अथवा प्रिकॉशन डोस राहिला आहे अशा नागरिकांना भारतात उपलब्ध असलेल्या कोविड लसींपैकी कोणतीही एक लस घेण्यास परवानगी दिली आहे. सदर कोविड लसीकरणाची नोंद कोविन अॅपमध्ये करण्यासाठी योग्य ते बदल कोविन अॅपमध्ये करण्यात आले आहेत.

तरी ज्या भारतीय किंवा परदेशी नागरिकांनी परदेशात कोविड लसीकरणाचा पहिला डोस घेतला आहे परंतु दुसरा अथवा प्रिकॉशन डोस राहिला आहे अशा नागरिकांनी महानगरपालिकेच्या कोविड १९ लसीकरण केंद्रांवर जाऊन कोविड १९ प्रतिबंधक लसींच्या दुसरा अथवा प्रिकॉशन डोसचे लसीकरण करून घ्यावे.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**